# मुंबई विद्यापीठ

**तात्काळ/अति महत्वाचे**

**परिपत्रक**

क्र. वि.नि.वि.वि./४३२/२२/२०१५

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबधित संस्थाचे अध्यक्ष/ सचिव यांना कळविण्यात येते की, सर्व महाविद्यालयात मराठी भाषा दिवस साजरा होतो का? व तसेच त्याचा आढावा विद्यापीठात सादर का केला जात नाही नमुद माहितीबद्दल विचारणा केलेली होती. याबाबत विद्याविषयक नियोजन आणि विकास विभागास मराठी भाषा दिन साजरा करण्याबाबतची माहिती/आढावा अद्याप सादर केलेला नाही त्यामुळे आपल्या महाविद्यालयातील संबधित माहिती **दिंनाक ६ मार्च २०१५ पर्यंत सहायक कुलसचिव, विद्याविषयक नियोजन आणि विकास विभाग कक्ष क्र. १३२ पहिला माळा, फोर्ट मुंबई - ४०० ०३२** येथे लेखी स्वरूपात तात्काळ पाठविण्याची व्यवस्था करावी. आपल्याकडील माहिती प्राप्त न झाल्यास तसेच शासनाने याबाबतीत कोणत्याही प्रकारची चौकशी किंवा कारवाई केलेली नाही यानंतर आपल्याकडील मराठी भाषा दिनाची माहिती विद्याविषयक नियोजन आणि विकास विभागास उपरोक्त **(दिनांक ६ मार्च २०१५)** पर्यंत प्राप्त न झाल्यास जर काही कारवाई/आदेश दिले तर त्या आदेशानुसार आमच्या विभागामार्फत समिती नेमुन कारवाई केली जाईल कृपया याची नोंद घ्यावी.

मुंबई:-४०० ०३२
दिनांक:-३ फेब्रुवारी,२०१५

सहायक कुलसचिव
(वि.नि.वि.वि.)

---

प्रती,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यायातर्फे संबधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांचे माहितीसाठी आणि तात्काळ कार्यवाहीकरिता रवाना.

सहायक कुलसचिव
(वि.नि.वि.वि.)